**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** बेगमपूरा
**Year (वर्ष):** 2025
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0096
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/04/2025 21:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 24/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/04/2025
**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/04/2025 **Time (वेळ):** 21:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 030
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/04/2025 21:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** परकीय भाषा विभागाचे समोर रोडवर,ड बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): फकिरचंद काशीनाथ औचरमल

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बुध्दवाडा, जुना बायजीपुरा, ,अँपेक्स हस्पीटलजवळ,छत्रपती संभाजीनगर, बेगमपूरा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बुध्दवाडा, जुना बायजीपुरा, ,अँपेक्स हस्पीटलजवळ,छत्रपती संभाजीनगर, बेगमपूरा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9890901004

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिपक नंदकिशोर रॉय | | | 1. भिमनगर, भावसिंगपुरा, ,पायल हॉटेलजवळ,छत्रपती संभाजीनगर,,बेगमपूरा,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रूपचंद बाबुलाल मुंगसे | | | 1. पहाडसिंगपुरा, मकबऱ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर, ,बेगमपूरा, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय छत्रपती संभाजीनग दिनांक:- 24/04/2025.

मी फकिरचंद काशीनाथ औचरमल, वय 45 वर्षे, व्यवसाय सामाजिक कार्यकर्ता, रा. बुध्दवाडा, जुना बायजीपुरा, अॅपेक्स हॉस्पीटलजवळ, छत्रपती संभाजीनगर. मोबा. 9890901004.

मी आज दिनांक 24/04/2025 रोजी श्री. अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माझी दोन लोकसेवका विरुध्द पैसे मागत असले बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता त्यांनी त्यांचेकडील पोलिस अंमलदार हिवाळे यांना दोन पंच आणणेकरीता पत्र देवून पंच आलेवर पंचांची व माझी ओंळख करुन दिली व पंचासमक्ष मला तक्रारीबाबत विचारणा केली असता मी स्वहस्ताक्षरात तक्रार लिहून दिली की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असून मी समाजकार्याचे काम करतो.

माझी आई रूखमनबाई काशीनाथ औचरमल ही डॉ. बाबासाहेब आबेंडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर सेथे सफाई कामगार या पदावर काम करत होती. ती दिनांक 30/04/2022 रोजी सेवानिवृत्त झाली आहे. सध्या आई मानधनावर विदयापीठामध्ये काम करत आहे. माझ्या आईचे सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम 3,63,619 रूपये ही आलेली असल्याने सदर रक्कम सह संचालक, शिक्षण विभाग कार्यालय, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातून मिळवून देण्याकरीता विदयापीठातील शिपाई श्री. रॉय व श्री. मुंगसे यांनी दिनांक 19/04/2025 रोजी विदयापीठामध्ये माझ्याकडे अठरा हजार रूपयांची मागणी केली आहे. मी दिनांक 23/04/2025 रोजी माझे आईला विदयापीठात कामावर सोडून येत असतांना मला आज रोजी अठरा हजार रूपये घेवून येण्यास सांगितले आहे. मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी आपणाकडे तक्रार देत आहे. माझी व श्री. मुंगसे, श्री. रॉय यांची पुर्वदुश्मनी किंवा देणे-घेणेचा अथवा उसनवारीचा व्यवहार नाही. आज दिनांक 24/04/2025 रोजी मी श्री. मुंगसे, श्री. रॉय यांची विदयापीठ परीसरात परकीय भाषा विभागाजवळ जाऊन भेट घेऊन माझे आईचे सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम बाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी श्री. मुंगसे, श्री. रॉय यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कारवाई करावी. मी माझे व माझे आईचे आधार कार्डची झेरॉक्सप्रत आपणाकडे हजर करीत आहे." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 24/04/2025 रोजी श्री. मुंगसे, श्री. रॉय हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री. अविनाश थोरात यांना विदयापीठ परीसरात परकीय भाषा विभागाजवळ श्री. मुंगसे, श्री. रॉय यांचेकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/धस यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर मी माझे मोटारसायकलने व दोन्ही पंच, पोनि/धस, पोअं/हिवाळे, चापोअमलदार बागुल असे शासकीय वाहनाने विदयापीठ परीसरात महाराष्ट्र बँकेच्या बाजूला जावून थांबलो. पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. अविनाश थोरात यांना विदयापीठ परीसरात परकीय भाषा विभागाजवळ श्री. मुंगसे, श्री. रॉय यांचेकडे माझेकडील मोटारसायकल क्र. MH 20-CC-421 ने 12.17 वाजता

पाठवले. मी व पंच क्रमांक -1 श्री. अविनाश थोरात यांना विदयापीठ परीसरात परकीय भाषा विभागाजवळ गेलो त्याठिकाणी माझी व श्री. रॉय यांची भेट झाली भेटी दरम्यान माझे आईचे सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कमबाबत कामासंदर्भाने चर्चा झाली. त्यासाठी अठरा हजार रूपये दयावे लागतील असे म्हणाले व श्री. रॉय यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9923989613 वरून श्री. मुंगसे यांचा मो.क्र. 9834788570 यावर फोन करुन सांगितलेवर श्री. मुंगसे यांनी मला अठरा हजार रूपये दयावे लागतील असे म्हणून श्री. रॉय यांचेकडे देण्यास सांगितलेने ए.टी.एम. मधून काढून आणतो असे सांगून मी व पंच श्री. अविनाश थोरात असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.23 वाजता परत आलोत तेथे आल्यानंतर पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/धस, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. रॉय व श्री. मुंगसे यांनी सह संचालक, शिक्षण विभाग कार्यालय, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील निंबाळकर साहेबांना देण्यासाठी 18000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे मान्य केले. त्यानुसार पोनि/धस यांनी मला व दोन्ही पंचांना श्री. रॉय व श्री. मुंगसे यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले.पोनि/धस यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/धस यांनी सापळा कारवाईसाठी ॲथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लेंम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/धस यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 18000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 36 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्री. राजु पठारे यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास पोअं/बागुल यांनी ॲथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/धस यांनी मला श्री. रॉय यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 18000/-रु. काढुन श्री. रॉय यांना द्याव्यात व त्यानंतर गळयात अडकवलेले पाढरे मोठे उपरणे (गमचा) डाव्या हातात घ्यावा असा इशारा नेमुन दिला. त्यानंतर पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. अविनाश थोरात यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 18000/-रु. लाच रक्कम श्री. रॉय यांना देण्यासाठी 12.55 वाजता विदयापीठ परीसरात परकीय भाषा विभागाजवळ रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/धस, पोअं. हिवाळे, पंच क्र. 2 श्री राजू पठारे असे सापळा पथकासह येत होते. मी व पंच क्रमांक 1 परकीय भाषा विभागाजवळ गेलो. त्याठिकाणी रोडलगत झाडाखाली श्री. रॉय हे बसलेले होते. मी व पंच क्र.1 असे त्यांचेजवळ गेलो. मी माझे पँटचे खिशातून लाच रक्कम काढून श्री. रॉय यांचेसमोर धरली असता त्यांनी ती उजवे हाताने स्विकारून दोन्ही हातांनी मोजून त्यांचे शर्टचे डावे बाजूचे खिशात ठेवली. आता हे सर्व पैसे मी मुंगसे भाऊकडे देणार आहे, माझ्याकडे नाही यायचं, असं म्हणाले व ते निंबाळकर आपल्याकडून कुठे पैसे घेतो डायरेक्ट, हे मुंगसे त्याला देतात. पहिले दहा टक्क्याने पैसे घेत होते, मग निंबाळकर साहेबांना भेटून पाच टक्के केले, नाहीतर तुला छत्तीस हजार रूपये दयावे लागले असते, असे श्री. रॉय म्हणाले. त्यानंतर लाच स्विकारल्यावर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 13.00 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/धस, पो.अंम. हिवाळे, सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक 2 श्री. राजु पठारे हे तात्काळ घटनास्थळावर हजर आले. पोशि/ हिवाळे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/धस यांनी श्री. रॉय यांना ताब्यात घेवून त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/धस यांनी पंच क्रमांक-1 श्री. अविनाश थोरात यांना पंच क्रमांक 2 श्री. पठारे यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक -1 श्री. थोरात यांनी सांगितले की, " श्री. रॉय यांनी अठरा हजार रूपये लाचेची मागणी करुन 18,000/-रु. लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन मोजून स्वत:चे अंगावरील शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवली आहे. " असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री. थोरात यांनी केला.

पोनि/धस यांनी श्री. रॉय यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव दिपक नंदकिशोर रॉय, वय 59 वर्षे, शिपाई, परकीय भाषा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर, रा. भिमनगर, भावसिंगपुरा, पायल हॉटेलजवळ, छत्रपती संभाजीनगर, (वर्ग-4) असे सांगीतले. पोनि/धस यांनी श्री. रॉय यांना 18000/-रु. लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी अंगावरील शर्टचे खिशात ठेवली आहे असे सांगितले. पोनि/धस यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री. पठारे यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले असता, पंच क्रमांक 2 श्री. पठारे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/धस यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/धस यांनी काळ्या कपडयाच्या सहाय्याने अंधार करून श्री. रॉय यांचे दोन्ही हात व शर्टचा खिसा,

लाच रक्कम यावर अल्ट्राव्हायलेट प्रकाश टाकून तपासणी केली असता त्यावर हिरवट चकाकी दिसून आली. पोनि/धस यांनी श्री. रॉय यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी माझे आईचे नाव असलेल्या यादीचा कागद खिशातून काढून दिलेने सदरचा कागद ताब्यात घेतला त्यावर अनुक्रमांक 45 वर माझे आईचे नाव आहे. पोनि धस यांनी श्री. मुंगसेबाबत श्री. रॉय यांना विचारले असता श्री. रॉय यांनी श्री. मुंगसे विदयापीठाचे प्रशासकीय इमारतीत असल्याचे सांगितले. आम्ही सर्व सापळा पथक व श्री. रॉय असे विदयापीठाचे प्रशासकीय इमारतीत गेलो तेथे श्री. मुंगसे मिळून आलेने त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. पोनि धस यांनी श्री. मुंगसे यांना त्यांची व सापळा पथकाची, पंचांची ओळख सांगुन घडलेल्या प्रकाराची माहीती देवून श्री. मुंगसे यांना त्यांचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव रूपचंद बाबुलाल मुंगसे, वय 54 वर्षे, शिपाई, प्रशासकीय ईमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर, रा. पहाडसिंगपुरा, मकबऱ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर, (वर्ग-4) असे सांगीतले. त्यानंतर पोनि/धस यांनी पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/धस, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, दोन्ही आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे आलोत. त्याबाबत दिनांक 24/04/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे. त्यांनतर पोनि/धस यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि/धस यांचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्याप्रमाणे टंकलिखीत करण्यात आलेली आहे.विदयापीठातील शिपाई श्री. रॉय व श्री. मुंगसे यांनी माझ्या आईचे सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम 3,63,619 रूपये आलेली असल्याने सदर रक्कम सह संचालक, शिक्षण विभाग कार्यालय, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातून मिळवून देण्याकरीता सह संचालक, शिक्षण विभाग कार्यालय, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील निंबाळकर साहेबांना देण्यासाठी माझ्याकडे 18,000/-रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दिनांक 24/04/2025 रोजी 13.00 वा. परकीय भाषा विभागाचे समोर रोडवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे श्री. रॉय यांनी पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता, श्री. दिपक रॉय यांना लाचेच्या रकमेसह पकडले आहे. म्हणुन माझी दिपक नंदकिशोर रॉय, शिपाई, परकीय भाषा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर, रा. भिमनगर, भावसिंगपुरा, पायल हॉटेलजवळ, छत्रपती संभाजीनगर व रूपचंद बाबुलाल मुंगसे, शिपाई, प्रशासकीय ईमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर, रा. पहाडसिंगपुरा, मकबऱ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MANGESH NANDKUMAR JAGTAP(I (Inspector)) / 149010000362MNJM8101X **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

F.S.H.Chsmal

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in Charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MANGESH NANDKUI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 14901000362MNJM810